**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.**

**दिनांक – 09/03/2024** **वार – शनिवार**

---

**निवडणूक**

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी प्रत्येक प्रभाग कार्यालयात 'तुमच्या मतदान केंद्राविषयी जाणून घ्या' कक्ष स्थापन करावा आणि विविध माध्यमांद्वारे मतदारांना मतदान सुविधेबाबत माहिती द्यावी, असे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी आज दिले. लोकसभा निवडणुकीसंबंधी कामासाठी नियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी आणि समन्वयक अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

**नियुक्ती**

पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता आणि डेप्युटी कमांडंट म्हणून मेजर जनरल गिरिराज सिंग यांनी पदभार स्विकारला आहे. याच महाविद्यालयाचे ते माजी विद्यार्थी असून 1989 मध्ये त्यांनी आपली लष्करी कारकीर्द सुरु केली होती.

**उन्हाळी**

पुणे जिल्ह्यात उन्हाळी हंगामातील पिकांखालील सरासरी क्षेत्र 11 हजार 94 हेक्टर आहे. त्यापैकी 5 हजार 303 हेक्टरवर म्हणजे सरासरीच्या 48 टक्के क्षेत्रावरील पिकांच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. उन्हाळी बाजरी पिकाखालील सरासरी क्षेत्र 4 हजार 233 हेक्टरपैकी 39 टक्के क्षेत्रावरच पेरणी पूर्ण झाली आहे. पाण्याची शाश्वत उपलब्धता कमी असल्यामुळे पेरण्यांखालील क्षेत्र घटलं आहे अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

**स्मार्ट-**

पुणे महावितरणकडून जिल्हयातील 37 लाख तर राज्यात दोन कोटी 41 लाख ग्राहकांना मोफत स्मार्ट वीजमीटर बसविण्यात येणार आहे. नवीन वीज जोडण्यांची मागणी वाढत आहे, वीजबीलांचा भरणा न होणं, थकबाकीमुळं वीजपुरवठा खंडीत करावा लागतो, त्यामुळे स्मार्ट मीटरची प्रक्रीया सुरू करण्यात आली असल्याचं पुणे महावितरणकडून कळविण्यात आलं आहे.

**विश्वकर्मा-**

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ आणि जिल्हा ग्रामोद्योग सहकारी महासंघाद्वारे पुण्यात वानवडी इथल्या महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहात उद्या सकाळी 11 वाजता पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेची कार्यशाळा आणि जनजागृती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यास जिल्ह्यातील जास्तीत जास्त कारागिरांनी उपस्थित राहून नाव नोंदणी करावी असं आवाहन महासंघाचे अध्यक्ष शिवाजीराव आदमाने यांनी केलं आहे.

**महिला**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विज्ञान संस्थेच्या चिंचवड येथील प्रांगणात काल जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या दिनाचं महत्व संचालक डॉक्टर शिवाजी मुंढे यांनी विशद केलं. याप्रसंगी एटॉस लिमिटेडच्या प्रशिक्षकांनी संस्थेच्या विद्यार्थिनी आणि महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

**महिला**

जागतिक महिला दिनानिमित्त रोटरी क्लब पुणे प्राईडच्या वतीनं  डॉक्टर लीलावती नारळीकर आणि आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट मधील डॉ.मोनाली राहुलकर यांना “व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसंच विनायक इंजिनिअरींग सिस्टीम्स यांना रोटरी मित्र पुरस्कार देण्यात आला.

**<u>मालमत्ता</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाच्या वतीने जप्त केलेल्या मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांनी त्वरित थकीत कर भरून जप्तीची कारवाई टाळावी असं आवाहन कर संकलन विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. कर संकलन विभागानं 818 कोटी रुपये  कर संकलन करुन गेल्यावर्षीचा कर संकलनाचा टप्पा ओलांडला आहे अशी माहिती सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.

**<u>वेकअप</u>**

सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासह धोरणांची काटेकोर अंमलबजावणी, शहराचं दूरगामी नियोजन, खासगी वाहनांवर नियंत्रण, पादचारी आणि सायकलस्वारांना प्रोत्साहन आणि प्रभावी वाहतूक जनजागृती यातूनच पुण्याच्या वाहतूक कोंडीवर मार्ग निघेल, असा सूर आज आय़ोजित ट्रॅफिक परिषदेत उमटला. 'वेकअप पुणेकर' या लोकचळवळीच्या वतीनं आयोजित या परिषदेत संयोजक माजी आमदार मोहन जोशी यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, पुणेकर नागरिक उपस्थित होते. वाहतूक कोंडी सोडवायची असेल, तर पोलिसांनी कठोर व्हायला हवे. एक दिवस तरी विनावाहन किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर केला पाहिजे असं वक्त्यांनी सुचवलं.

**<u>कबड्डी</u>**

पुणे जिल्हा कबड्डी संघटनेच्या वतीनं आयोजित युवा कबड्डी आंतर जिल्हा स्पर्धेत मुबई शहर विरुद्ध रत्नागिरी यांच्यातील लढत बरोबरीत सुटली. अहमद नगर संघानं सलग चौथा विजय नोंदवला तर रायगड संघानं नांदेड संघावर मात केली.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल तापमान 37 अंश तर किमान तापमान 14 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तातं, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**